नांदेड जिल्ह्यातील बंजारा समाजातील शेतमजूर महिलांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास

सारांश सादरीकरण

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

संशोधक

राठोड बळीराम चंदू

सहयोगी प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख

ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय वसंतनगर (को)

ता. मुखेड जि. नांदेड

मार्गदर्शक

डॉ. कच्छवे मारोती धोंडीबा

प्रोफेसर, वाणिज्य विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक

कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी

वर्ष . २०२१

नांदेड जिल्ह्यातील बंजारा समाजातील शेतमजूर महिलांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास

प्रस्तावना:

भारत हा शेतीप्रधान देश असून, भारताला खेड्यांचा देश असेही म्हटले जाते. भारतीय जणगणनेनुसार (२०११) १३० कोटी लोकसंख्येपैकी ३१.१६ टक्के लोकसंख्या ही शहरी भागातील असून उर्वरीत ६८.८४ टक्के लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते. म्हणून असेही म्हटले जाते की, भारताचे खरे दर्शन खेड्यांमध्येच होते. देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ६५ टक्के लोकसंख्या ही आपल्या उदरनिर्वाहासाठी शेतीवर अवलंबून आहे.

भारतासारख्या विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून शेती व्यवसायाकडे पाहिले जाते. राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक विकासामध्ये शेतीक्षेत्राचे अनन्यसाधारण महत्व आहे. भारतातील ग्रामीण भागातील लोकांचा केवळ व्यवसायच नव्हे तर तो एक जीवनमार्ग आहे. असा कृषी क्षेत्रातील शेती हा व्यवसाय आज अनेक आव्हाने पेलत आहे. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सरकारने वेळोवेळी अनेक योजना व कार्यक्रम सुरु केले आहेत. ज्यामुळे कृषी क्षेत्राची अपेक्षित प्रगती साध्य करण्यात चोगले यश आले आहे. शेतमजूर हा कृषीक्षेत्राशी संबंधीत महत्वाचा घटक आहे. भारतीय शेतीत श्रमप्रधान तंत्राचा वापर केला जातो. त्यामुळे शेतीत श्रमशक्तीचा म्हणजेच शेतमजूरांचा वापर करणे आवश्यक ठरते. दुस-या बाजूस भारताच्या वाढत्या लोकसंख्येमुळे मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध होते.

भूमीहीन शेतमजूर, अल्पभूधारक शेतकरी, स्त्रिया हे लोक शेतमजूर म्हणून काम करत असल्याचे आढळून येते. या शेतमजूरांची असंघटीतपणा, अशिक्षितपणा, दरिद्रय अशी काही मुख्य वैशिष्ट्ये आहेत. भारताच्या लोकसंख्येत स्त्रियांचे जितके प्रमाण आहे त्या तुलनेत विकासातील त्यांचा सहभाग बराच कमी आहे. महिला शेतमजूर ह्या विकासाच्या प्रक्रियेपासून अतिशय दूर आहेत. शेतमजूर महिलांच्या परिस्थीतीतील बदलाचे एक महत्वपूर्ण साधन म्हणजे शिक्षण होय. शिक्षण ही महिलांच्या सक्षमीकरणाची सुरुवात होय. ग्रामीण भागातील महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण जरी ४७ टक्के इतके कमी असले तरी तेथील कामांमधील त्यांचा सहभाग साधारणत: पुरुषांइतकाच आहे. शेतमजूरीच्या कामात तर महिलांचाच सहभाग जास्त दिसून येतो. ग्रामीण भागात महिला शेतमजूरांचा मोठा वर्ग असून तो अतिशय हलाखीच्या परिस्थीतीत जीवन जगत आहे. दिवसेंदिवस त्यात वाढ होत आहे. ग्रामीण भागातील शेती व्यवसायात काम करणा-या शेतमजूरांची स्थिती आर्थिकदृश्ट्या हालाखीची आहे. शेतमजूरांच्या आर्थिक दूरावस्थेला अनेक कारणे जबाबदार आहेत. असंघटीत स्वरुप, कर्जबाजारीपणा, निरक्षरता यासारख्या कारणांमुळे शेतमजूरांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी सरकारने अनेक उपाय योजले आहेत मात्र अजूनही शेतमजूरांच्या आर्थिक स्थितीत फार मोठ्या प्रमाणात सुधारणा झालेली नाही.

शेतमजूरांची संकल्पना :

शेतमजूर हे ग्रामीण अर्थव्यवस्थेतील आर्थिकदष्ट्या दुर्बल व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या गटातील असून हा घटक कायमच दुर्लक्षिलेला दिसतो. दिवसेंदिवस शेतमजूरांची आर्थिक स्थिती खालावत असलेली आढळते. त्यांना मिळणारे उत्पन्न कमी असते. रोजगार अनियमित असतो. त्यांचे राहणीमान गरिबीचे असून ते कर्जात बुडालेले आहेत. शेतमजूराची निश्चित अशी व्याख्या करणे अवघड आहे. मात्र तज्ञांनी व काही समित्यांनी शेतमजूराचा अर्थ स्पष्ट करण्याचा वेळोवेळी प्रयत्न केलेला दिसतो. १९५०-५१ च्या शेतमजूर चौकशी समितीच्या मते, जे लोक शेतीच्या लागवडीमध्ये गुंतलेले असून त्यासाठी मजूरी घेतात ते शेतमजूर असतात. तथापि मजूरी घेऊन काम करणारे आणि मजूरी न घेता काम करणारे यांच्यामध्ये फरक करणे कठिण आहे. काही मजूर असेही असतात जे वर्षातील काही दिवस मजूरीवर काम करतात. खेड्यातील सिमांत कास्तकारांचे उदाहरण घेतल्यास त्यांना त्यांच्या अतिशय छोट्या धारणक्षेत्रात संपूर्ण वर्षभर काम नसते. त्यामुळे वर्षातील काही काळ ते तसेच काम करतात. तर उर्वरीत काळात मजूरी घेऊन इतरांच्या शेतीवर काम करतात. या अडचणीच्या संदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, कुटुंबातील अर्धे किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती शेतीत मजुरी करत असतील तर ते शेतमजूर कुटुंब म्हणायला हरकत नाही.

कृषी क्षेत्र आणि महिला :

महिला वर्गानी सर्वच क्षेत्रात आघाडी घेतली आहे. मग चंद्रावरची मोहीम असो, एखाद्या नामाकित आयटी कंपनीची सीईओ असो किंवा सत्तेतील प्रमुख पद असो. कुटुंब ते देश अशी समर्थपणे जबाबदारी सांभाळणा-या महिला शेतीकामातही अग्रेसर आहेत. परंतु शेतीकाम, बांधकाम क्षेत्र किंवा घरकाम करणा-या महिलांचे योगदान हे नेहमीच दुर्लक्षित राहिले आहे. तिला मिळणारा मोबदला हा तिच्या श्रमाला पुरक नसतो. आजही पुरुषाच्या तुलनेत महिला मजुरांना कमीच मजुरी मिळते. अगोदरच सामाजिक दरीचा सामना करणा-या महिला वर्गांना आर्थिक विषमतेचाही सामना करावा लागत आहे.

शेतीकामात विषेशतः ग्रामीण भागातील शेतीकामात काम करणारे सर्वच शेतमजूर पुरुष अथवा स्त्री या सगळ्याच जाती-धर्माच्या समाजाचे असतात.

सध्या राजधानीत कृषी कायद्याच्या विरोधात सुरु असलेल्या शेतकरी आंदोलनाला सहा महिन्याहून अधिक काळ लोटला आहे. दिल्लीच्या सीमेवर या कायद्याच्या विरोधात शेतकरी ठाण मांडून बसले आहेत. त्याचवेळी त्यांचे कुटुंब विषेशतः महिला वर्गानी त्यांच्या शेतीकामाची जबाबदारी घेतली आहे. आपल्या देशातील शेतीकामात महिलांचे असणारे योगदान नाकारता येणार नाही. ऑक्सड्गेम इंडियाच्या मते आजघडीला ग्रामीण भागातील ८५ टक्के महिला या कृषी क्षेत्रात काम करत आहेत. मग त्या शेतमजूर असो किंवा शेतकरी असो विशेष म्हणजे केवळ १३ टक्के महिलांकडे जमीनीची मालकी आहे.

पंजाब आणि हरियानाने यंदा कृषी उत्पादनात जबरदस्त आघाडी घेत महिला शेतक-यांनी सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. प्रत्यक्षात महिला शेतमजुरांना किंवा शेतकरी महिलांना शेतीबाबत शास्त्रीय प्रषिक्षण आणि लागवडीची माहिती दिल्यास त्या आणखी चांगल्या रितीने शेतीकामात योगदान देऊ शकतील. कृषी सुधारणा केल्या जात असताना महिला शेतमजुरांचा थोडासा उल्लेख आढळून येत नाही किंवा त्यास महत्व दिले जात नाही. परंतू सरकार आणि कृषी तज्ञांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

बंजारा समाज :

भारतातील भटकंती करणा-या अनेक जमार्तीपैकी बंजारा जमात हा समाज ही एक प्रमुख जमातसमाज आहे. बंजारा हा शब्द जाती सूचक नसून व्यवसाय सूचक आहे. बंजारे फक्त मालाची ने-आण करणारे होते. व्यापार करणारे नव्हते. प्राचीन कालखंडापासून ते ब्रिटीश कालखंडापर्यंत मालाची ने-आण बंजारा करत असत. त्यांची भाषा, त्यांचा पोशाख व राहणीमान या सर्व बाबींचा बारकाईने विचार केल्यास ते राजस्थानचे असावेत असा निष्कर्ष निघतो. परंतु त्यांची लोकगीते, अलंकार, केशभुषा या बाबीवरुन ते सिंधू-गंगा या खो-यातील असावेत असे वाटते. प्राचीन कालखंडात गुरे पाळणे, गुरे भाड्याने देणे त्यावरुन "गोर" बंजारा हे नाव पडले.

या समाजातील लोक धाडसी आणि कर्तृत्ववान असल्यामुळे ते भारतभर स्वबळावर मालाची ने-आण करीत फिरत. ते ज्या रस्त्यांनी ये-जा करत त्यास पुढे "लमाण मार्ग" म्हणून ओलखले गेले. ब्रिटिशांनी या समूहाबरोबर राहून या लमाण मार्गाची पुर्णपणे ओळख करुन घेतली. त्याचा उपयोग पुढे राष्ट्रीय रस्ते व लोहमार्ग तयार करण्यासाठी केला हे विशेष. बंजारातील असलेले संस्कार, सण, समारंभ, चालिरिती, केशभुषा आणि वेशभुषा या सर्वातून एक विशिष्ट संस्कृती दिसून येते. परंतु वेगवेगळ्या राज्यातील बंजारांच्या भाषांमध्ये त्या-त्या राज्यातील प्रादेशिक भाषेचा थोडा प्रभाव दिसून येतो. बंजारात संस्काराला फार महत्व आहे. हिंदूच्या सोळा संस्काराप्रमाणे बंजारात तीन संस्कार हे मुख्य मानतात. जन्म संस्कार, विवाह संस्कार आणि अंत्य संस्कार हे मुख्य संस्कार आहेत. बंजारा समाजातील सण आणि उत्सव हे आनंदी आणि उत्साही बनवतात. होळी हा सण बंजारा समाजात महत्वपूर्ण आहे. नृत्य, संगीत व लोकगीताच्या माध्यमातून सण साजरा केला जातो. होळी प्रमाणे "तीज" हा सण अविवाहित मुली अतिशय भावपूर्ण रितीने साजरा करतात. दिपावली हा सुध्दा एक महत्वपूर्ण सण आहे.

म्हाराष्ट्रातील प्रामुख्याने ग्रामीण भागात बंजारा समाजातील लोकांकडे फार कमी शेतमजीन आहे. आणि संशोधन भागात बंजारा समाजाचा अभ्यास करता असे दिसून येईल की या समाजातील शेतजमिनीचे मालक कमी मात्र शेतमजूर जास्त आहेत. बंजारा समाजातील पुरुष आणि महिला दोघेही आपआपल्या गावात शेतमजूर म्हणून काम करतात. इतकेच नव्हे तर या समाजातील पुरुषांसोबत महिला देखील मोठ्या प्रमाणात ऊस कापणीसाठी इतर जिल्ह्यात, इतर राज्यांत जातात आणि आपल्या कुटुंबाला आर्थिक मदत करतात.

विषय निवडीचा हेतू :

भारतात शेतमजुरांचे प्रमाण व त्यांना मिळणारे उत्पन्न कमी अशी स्थिती आहे. अभ्यास क्षेत्रातील बंजारा समाजातील पुरुष शेतमजूरांना मिळणा-या अपु-या उत्पन्नात उदरनिर्वाह होत नसल्याने स्त्री शेतमजूरही काम करतात. परंतु त्यांना मिळणारा मोबदला कमी आहे. नांदेड जिल्ह्यातील मुखेड, कंधार, लोहा तालुक्यातील स्त्री शेतमजूरांसाठी जिल्हा प्रशासनाने स्त्री शेतमजूरांसाठी त्यांच्या स्थितीचा आढावा घेऊन विविध सहकारी योजना राबविल्या आहेत.

सरकारी योजनांचा स्त्री शेतमजूरांवर अनुकूल परिणाम झाला का? स्त्री शेतमजूराला मजुरी व्यतिरिक्त इतर उत्पन्नाचे पर्यायी साधन उपलब्ध आहे का? महिला शेतमजूरांची आर्थिक व सामाजिक स्थिती त्यांचे समाजातील स्थान जाणून घेण्यासाठी संशोधकाने "नांदेड जिल्ह्यातील बंजारा समाजातील शेतमजूर महिलांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ मुखेड, कंधार, लोहा तालुका" या विषयाची निवड केली आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

सामाजिक शास्त्राची व्याप्ती प्रचंड प्रमाणात आहे. तसेच त्यांतील संकल्पना आणि त्यांचे स्वरुप यांचा आवाका व्यापक आहे. अशा परिस्थीतीत संशोधकास काही सैध्दांतिक किंवा व्यवहारिक उद्दिष्ट्यांची निश्चीती करणे आवश्यक असते. संशोधकास आपल्या संशोधनात "नांदेड जिल्ह्यातील बंजारा समाजातील शेतमजूर महिलांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ मुखेड, कंधार, लोहा तालुका" कांही उद्दिष्टांची निश्चिती केली जातील ती पुढीलप्रमाणे असतील.

१. अभ्यास क्षेत्रातील बंजारा समाजातील महिला शेतमजूरांना मिळणा-या रोजगाराचा व योगदानाचा अभ्यास करणे.
२. अभ्यास क्षेत्रातील बंजारा समाजातील शेतमजूर महिलांना उत्पन्न मिळवून देणा-या योजनांचा अभ्यास करणे.
३. बंजारा समाजातील महिला शेतमजूरांच्या संख्यात्मक व गुणात्मक परिस्थीतीचा अभ्यास करुन उपाय सुचविणे.
४. बंजारा समाजातील महिला शेतमजुरांच्या मजुरी दरातील बदलाचा अभ्यास करणे.
५. बंजारा समाजातील महिला शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक समास्यांचा अभ्यास करणे.
६. बंजारा समाजातील महिलांच्या शेतीतील विविध कामातील सहभागाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :

कोणत्याही सामाजिक घटनेचे अध्ययन करण्यासाठी शास्त्रीय पध्दतीचा अवलंब केला जातो. ज्ञान व अनुभवाच्या सहाय्याने संशोधन समस्येच्या विविध पैलूंच्या संबंधाला एक सामान्य अनुमान काढले जाते. संशोधकाने "नांदेड जिल्ह्यातील बंजारा समाजातील शेतमजूर महिलांच्या आर्थिक

स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ मुखेड, कंधार, लोहा तालुका" या विषयासंदर्भात अभ्यासासाठी संशोधकाकडून पुढील गृहितके विचारात घेतली जातील.

१. बंजारा समाजातील स्त्री शेतमजुरांच्या संख्येत वाढ झाली आहे व हंगामी रोजगार मिळतो.
२. स्त्री शेतमजुरांच्या वाढीव उत्पन्नामुळे त्यांच्या बचतीत वाढ होत आहे.
३. स्त्री शेतमजुरात शिक्षणाचे अल्पप्रमाण असल्यामुळे त्यांना आर्थिक हलाखीचे जीवन जगावे लागते.

संशोधन पध्दती :

"नांदेड जिल्ह्यातील बंजारा समाजातील शेतमजूर महिलांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ मुखेड, कंधार, लोहा तालुका" या प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी वर्णनात्मक, सर्वेक्षणात्मक व निदानात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला जाईल. तसेच तथ्य संकलनासाठी प्राथमिक व व्दितीयक सामग्री संकलन पध्दतीचा अवलंब केला जाईल.

नमुना निवड पध्दती :

प्रस्तुत संशोधनासाठी साधा यादृच्छिक नमुना निवड पध्दतीतील सोयीस्कर नमुना निवड पध्दतीचा अवलंब केला जाईल. नमुना निवड पध्दतीच्या आधारे नांदेड जिल्ह्यातील कंधार, मुखेड आणि लोहा अश्या एकूण ३ तालूक्यातून ३० गावांची निवड करण्यात येईल आणि प्रत्येक गावातून ३० महिला शेतमजूरांचा अभ्यास करण्यात येईल. असे एकूण ९०० महिला शेतमजूरांचा अभ्यास करण्याकरिता निवडण्यात येणार आहे. त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन मौखिक पध्दतीने प्रश्नावलीव्दारे माहिती संकलित करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन हे "नांदेड जिल्ह्यातील बंजारा समाजातील शेतमजूर महिलांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ मुखेड, कंधार, लोहा तालुका" संशोधन कालावधी हा २०१७ ते २०२० असा ठेवण्यात येईल.

संशोधनाची मर्यादा :

संशोधन कालावधी सन २०१७ ते २०२० असा आहे.

१. प्रस्तुत संशोधन नांदेड जिल्ह्यातील मुखेड, कंधार आणि लोहा तालुक्यापुरता मर्यादित ठेवण्यात येणार आहे.
२. प्रस्तुत संशोधनातील माहितीचे संकलन नमुना निवड पध्दतीने प्रश्नावलीव्दारे संकलित करण्यात येणार आहे. परंतु महिला मजुरांमध्ये शिक्षणाचे अल्प प्रमाण, लाजाळूपणा व गोपनियता यामुळे माहिती संकलनावर मर्यादा येण्याची शक्यता आहे.

३. माहिती व विश्वसनीय आकडेवारीचा अभाव, शासकीय गोपनियता व माहितीचा अपुरेपणा यामुळे माहिती संकलनावर मर्यादा येण्याची शक्यता आहे.

प्रकरणाचा आराखडा :

प्रस्तुत संषोधन हे सहा प्रकरणात विभागण्यात येणार आहे. प्रकरणाचा आराखडा हा खालीलप्रमाणे असेल...

प्रकरण १ : प्रस्तावना

प्रकरण २ : संशोधन पध्दती आणि संशोधन साहित्याचा आराखडा.

प्रकरण ३ : जागतिक, भारतीय आणि महाराष्ट्रातील महिलांचा कृषी आणि शेतमजुरीतील सहभाग.

प्रकरण ४ : नांदेड जिल्ह्याची आर्थिक व सामाजिक वैशिष्टे.

प्रकरण ५ : नांदेड जिल्ह्यातील बंजारा समाजातील महिला शेतमजुरांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास.

प्रकरण ६ : निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भ ग्रंथसूची :

१. जोशी एस.एस.(१९९५), 'मुलभूत पातळीवरील स्त्री-कामगार : एक सामाजिक अभ्यास', नवी दिल्ली, आशिष पब्लिशिंग हाऊस.
२. शरण रमेश आणि मारीश्वर दयाल(१९९३), 'बिहारच्या झारखंड विभागातील स्त्री-कामगारांचे अध्यपतन', सामाजिक बदल खंड, २३ क्र. ४ डिसेंबर.
३. पंडित आणि पाटील लीला, कृषी अर्थशास्त्राची मुलतत्वे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर १९८०
४. भिसे रामचंद्र, स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या काळात शेतीची वाटचाल, योजना ऑगस्ट, २०१२
५. कालाभूत, पुरुषोत्तम, 'लोकसाहित्य स्वरुप व विवेचन', विजय प्रकाशन, नागपूर, २००७
६. जाधव, भाई प्रेमसिंह, 'बंजारा दर्पण', बंजारा सांस्कृतिक साहित्य परिषद, औरंगाबाद, २००२
७. पवार रुक्मिणी, 'बंजारा लोकजीवन पध्दती', कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद, २००५.
८. पाटील बळीराम, 'गोर बंजारा लोकांचा इतिहास', शाम ब्रदर्स, नागपूर, १९३६.

English Reference :

1. Bhople, R.R. and Palki, A., Socioeconomic dimensions of farm women labour. Rural India, 61(10): 192-195, (1998).
2. Dogra Bharat, Women Farm Workers Need to Organize Them, Yojana Feb Vol-46, 2002.
3. Das, Arindam and Usami, Yoshifumi. Wage Rates in Rural India, Review of Agrarian Studies, Vol.7(2), 2017
4. Ghosh, M.M., and Ghosh, A., Analysis of Women Participation in Indian Agriculture. IOSR Journal of Humanities and Social Science, 19(5): 01-06, 2014.
5. Kruna Yadav and Revanna M.L., A Study on Socio-Economic Status of the Farm Women of Tamakuru District of Karnataka State, India, International Journal of Pure and Applied Bioscience, Vol-5, Issue-4, pp. 309-314, (2017)
6. Mamta and Devi, L.T., Prevalence of anemia and knowledge regarding anemia among reproductive age women, IOSR J. Nursing and Health Sci., 3(2): 54-60 (2014)
7. Mugadur N.S. and Hiremath R.C., Socio Economic Condition of Agriculture Women Labour: A Case Stduy, Indian Journal of Research, PARIPEX, Vol-3, Issue-4, pp. 50-52, (2014)
8. Meena, MS; Singh, KM and Meena, HM 2018, Participation and Perception Towards Changing Farming Practices in Eastern India: A Study of Women Headed Households. National Academy Science Letters, 41(4): 203-205, 2018.
9. Pavithra R.H., Socio-Economic Condition of Female Agricultural Labourers- With Special Reference to Mandya District, IRA-International Journal of Managemnet and Social Science, Vol-7, Issue-3, pp. 458-464, (2017)
10. Rahman, K.M.M. and Sousa-Poza, A., Food consumption and nutritional status of vulnerable people rearing livestock in Bangladesh., Bangladesh J.Agric. Econs, 33(1): 41-56 (2010).

राठोड बळीराम चंदु — **(संशोधक)**

डॉ. कच्छवे मारोती धोडिंबा — **(मार्गदर्शक)**